आपले अवयव दान .. गरजूंसाठी जीवनदान.. पथनाट्यातून केली जनजागृती

मुंबई : जगात सर्वात श्रेष्ठदान म्हणून अवयव दानाचे महत्व आहे या संबंधी समाज प्रबोधन करण्याकरिता भांडुप विधानसभा परिसरात जगजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भांडुप येथील डी.ए.व्ही.कॉलेज मध्ये माहिती पत्रिका, घोषवाक्य, भित्तिचित्र, स्लोगन्सच्या माध्यमातून या कार्यक्रमाची सुरुवात झाली. कॉलेज आणि जीवनदान संस्था भांडूप, यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.जगात सर्वात श्रेष्ठदान म्हणून अवयव दानाचे महत्व अधोरेखित झालेले आहे.यासाठी सर्वसाधारण माणसांमध्ये अवयव दानासंबंधी जनजागृती करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन युवासेना कार्यकारणी सदस्य राजोल संजय पाटील यांनी यावेळी केले. अवयव दानाविषयी समाजात अजून फार अंधश्रद्धा, गैरसमज आहेत ते दूर करून या लोकाभिमूख चळवळीविषयी जगजानजागृती करणे आवश्यक असल्याचेहा त्या म्हणाल्या.

स्ट्रीट फर्निचर घोटाळ्याबाबत योग्य माहिती न दिल्यास विशेषाधिकार वापरणार -आदित्य ठाकरे

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई : मुंबई महापालिकेत स्ट्रीट फर्निचर कामाअंतर्गत झालेला घोटाळा मी बाहेर काढला आहे. या घोटाळयाची पालिका अधिकाऱ्यांमार्फत, अंतर्गत की, बाह्य संस्थेच्या मार्फत कायदेशीर चौकशी करणार? या संबंधित उपायुक्त यांचीही चौकशी होणार आहे का? तसेच, सदर प्रस्तवावर जर तुम्ही सही केली असेल तर तुम्हीही चौकशीचा भाग असणार आहात का? याबाबत योग्य ती थेट उत्तरे देण्यात यावीत. अन्यथा नाईलाजाने विधानसभेच्या

विशेषाधिकाराचा वापर करावा, लागेल असा इशारा माजी मंत्री व विद्यमान आमदार आदित्य ठाकरे यांनी मुंबई महापालिका आयुक्त इकबाल चहल यांना दिला आहे.

त्यांनी आयुक्त चहल यांना 11 ऑगस्ट रोजी एक पत्र पाठवले आहे. या पत्रात त्यांनी मुंबई महापालिकेच्या स्ट्रीट फर्निचर कामाच्याअंतर्गतघोटाळाझाल्याचा आरोप केला आहे. तसेच, त्यामध्ये सदर कामातील घोटाळयाबाबत काही निवडक प्रश्न विचारले आहेत. पत्राच्या सुरुवातीला आदरणीय महोदय, गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने स्ट्रीट फर्निचरमध्ये झालेला घोटाळा मी जनतेसमोर आणला आहे. मुंबईकरांनी देखील यावर प्रश्न उपस्थित केले आहेत. मी या पत्राद्रारे तुम्हाला काही प्रश्न उपस्थित करू इच्छितो. त्याची आपण थेट उत्तरे द्यावीत, असे आमदार आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे.

1) स्ट्रीट फर्निचर घोटाळ्याच्या तपासाची पद्धत काय आहे?, तसेच महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून अंतर्गत तपासणी करण्यात येणार की, बाहेरील संस्थेकडून किंवा कायदेशीर तपासणी करण्यात येणार आहे?.

2) संबंधित उपायुक्त ज्यांच्या माध्यमातून ही निविदा प्रक्रिया सुरू झाली आणि जे अजूनही आम्हाला उत्तर देत आहेत, त्यांची विभागीय चौकशी होणार आहे का?,

3) ज्यांनी दरांबाबत बाह्य माहिती दिली आहे. (आम्हाला दिलेल्या उत्तरात नमूद केल्याप्रमाणे शहरी नियोजक आणि डिझाइनर), ते या तपासणीचा भाग असतील का?

4) समितीचा एक भाग म्हणून, सहाय्यक आयुक्त या तपासाचा भाग असतील का?

5) मला आधीच्या पत्रात उत्तर मिळाल्याप्रमाणे, सर्व दर कॉम्पिटिटिव्ह अथॉरिटी ने ठरवले होते, म्हणजे आपण का ?

6) आपण जर या फाईलवर सही केली असेल, तर आपण देखील या चौकशीला सामोरे जाणार का ? असे मोजके प्रश्न आमदार आदित्य ठाकरे यांनी पत्रातून उपस्थित केले आहेत.

चहल यांना यांना थेट इशारा

मला तुमच्याकडून थेट उत्तराची आशा आहे. ते न मिळाल्यास माझ्या राज्याच्या हितासाठी, मला महाराष्ट्र विधानसभेच्या विशेषाधिकाराचा वापर करावा लागेल, असा इशाराही त्यांनी पालिका आयुक्त चहल यांना दिला आहे.

राज्यात ह्युंदाई कंपनीकडून ४ हजार कोटी रूपयांची गुंतवणूक; पुण्यात उभारणार प्रकल्प

– उद्योग मंत्री उदय सामंत

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्रात ह्युंदाई कंपनीकडून 4 हजार कोटींची गुंतवणूक होणार असून पुण्यात पहिला प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या गुंतवणूकीतून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार आहे. तसेच दक्षिण कोरीयातील लोट्टे ग्रुप, एलजी इलेक्ट्रॉनिक्स कंपनीसुद्धा राज्यात गुंतवणूक करणार आहे, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

मंत्री श्री. सामंत यांच्या मुक्तागिरी निवासस्थानी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना मंत्री श्री. सामंत बोलत होते.

मंत्री श्री. सामंत म्हणाले, जनरल मोटर्स कंपनीच्या कामगारांचेप्रश्नसोडविण्यासंदर्भात ह्युंदाईच्या व्यवस्थापनासोबत सकारात्मक चर्चा झाली आहे. कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. द. कोरीयामधील आइस्क्रीम बनविणारी आघाडीची कंपनी लोट्टे उद्योगसमूह सुद्धा पुण्यात 475 कोटी रूपयांची गुंतवणूक करणार आहे. कंपनीच्या हँबमीअर ब्रँडचे उत्पादन या प्रकल्पात होणार आहे. हा प्रकल्प अनेक वर्षापासून रखडला होता, द. कोरीयाच्या दौऱ्यातील बैठकीत यावर सकारात्मक चर्चा झाली.

मंत्री श्री. सामंत म्हणाले, पाण्याच्या फिल्टरमध्ये असलेल्या ॲल्युमिनीअम झाकणी चा प्रकल्पही राज्यात येणार आहे. त्यासाठी 5 एकर जागेची मागणी कंपनीकडून करण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी पायाभूत सुविधा पुरविण्यात येतील. त्यामुळे या प्रकल्पास चालना मिळेल. तसेच इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राजील आघाडीच्या एल.जी कंपनीला महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याची विनंती करण्यात आली आहे. त्यानुसार कंपनीने पुण्यातील प्रकल्पाचा विस्तार करण्याचे सांगितले असून कंपनी जवळपास 900 कोटी रूपयांची गुंतवणूक करणार आहे. जे उत्पादन कोरीयात होते, असे उत्पादन भारतात येऊन करण्याची विनंतीही करण्यात आली आहे.

भारतात 4 डोअर फ्रीजचे उत्पादन, ट्रान्सफरन्ट दूरचित्रवाणी संच, फोल्डेबल टिव्हीचे सेमीकंडक्टरचे उत्पादन करण्याची विनंती सॅमसंग कंपनीला करण्यात आली आहे, तसेच डिसेंबर महिन्यात कॉस्मेटीक उद्योजकांचे मंडळ भारतात भेट देणार असून लँकमे कंपनी राज्यात आंतरराष्ट्रीय कार्यक्रमाचे आयोजन करणार आहे. असे सांगून मंत्री श्री. सामंत म्हणाले द.कोरीया देशाचा दौरा यशस्वी झाला असून आघाडीच्या कंपन्यांसोबत बैठका घेण्यात आल्या आहेत. तेथील उद्योजकांना राज्यात गुंतवणूक करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्यातील जे नागरीक द. कोरीयात आहेत, त्यांना राज्यात गुंतवणूक करायची असेल, तर अशा उद्योजकांना नवीन सवलती देण्यात येतील, राज्यात उद्योगासाठी पोषक वातावरण असून विदेशी गुंतवणूक राज्यात होत आहे.

भांडुपच्या यशवंत गोविंदा पथकांचा दहीहंडी फोडण्याचा सराव सुरु : पथकात मुलींचा उत्तम प्रतिसाद

प्रतिनिधी
■ मुंबई

दहीहंडी उत्सव काही दिवसांवर आल्याने गोविंदा पथकांचा सराव जोरात सुरू झाला आहे.भांडुप येथील यशवंत चांदजी सार्वत विद्यालयाच्या संचालिका व लोकप्रिय समाजसेविका नयनाताई श्याम तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली व कबड्डीचे राष्ट्रीय प्रशिक्षक आणि गोविंदा पथक प्रमुख सुरेंद्र मंचेकर, व शाळेचे संचालक मंदार सावंत सर यांच्या सहकार्याने यंदा थरावर थर रचले जाणार आहेत.

दहीहंडी फोडण्याचा सरावात दैनंदिन मुलींचा सहभाग वाढत आहे. अनेक तरुण युवती गोविंदा पथकात सहभागी झाल्याने त्यांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. भांडुप बरोबरच ठाण्यातील उत्सवात पाच, सहा ते सात थर रचण्यासाठी त्यांची दैनंदिन सरावाला जोरात सुरुवात झाली आहे.

भांडुप पश्चिमेच्या उत्कर्ष नगरातील शाळेच्या भव्य पटांगणात सायंकाळी 7 ते रात्री 10 या वेळेत सराव केला जातो. या गोविंदा पथकात अनेक महिलांचा देखील उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळत आहे. त्याही मोठ्या हिरिरीने सरावात रमल्या आहेत. दैनंदिन सरावासाठी मुलींचीही संख्या वाढत आहे.

पत्रकारांची 17 ऑगस्ट रोजी राज्यभर निदर्शने

कुचकामी ठरलेल्या पत्रकार संरक्षण कायदयाची होळी करणार

प्रतिनिधी
■ मुंबई

पाचोरा येथील पत्रकार संदीप महाजन यांना आमदार किशोर पाटील यांनी दिलेल्या अर्वाच्य शिव्या आणि नंतर त्यांच्यावर झालेल्या हल्लयाचा निषेध करण्यासाठी येत्या 17 ऑगस्ट 23 रोजी मुंबईसह राज्यभर निदर्शने करून पत्रकार संरक्षण कायदयाची होळी करण्याचा निर्णय मुंबईत झालेल्या 11 पत्रकार संघटनांच्या बैठकीत घेण्यात आला..या दिवशी मुंबईत दुपारी 12 वाजता हुतात्मा चौकात हे आंदोलन होईल.

बैठकीच्या आरंभी एस.एम देशमुख यांनी पाचोऱ्यातील घटनेची सविस्तर माहिती देऊन सर्व पत्रकार संघटनांनी एकत्र येऊन आमदाराच्या दादागिरीच्या विरोधात आवाज उठविला पाहिजे असा आग्रह धरला.. तेव्हा सर्व उपस्थित संघटनांच्या प्रतिनिधींनी त्यास संमती दर्शवत 17 ऑगस्ट रोजी राज्यभर निदर्शने करून पत्रकारांचे संरक्षण करण्यास निष्क्रिय ठरलेल्या पत्रकार संरक्षण कायद्याची होळी करण्याचा निर्णय घेण्यात आला..

यावेळीउपस्थित सर्वसंघटनांच्या प्रतिनिधींनी किशोर पाटील यांच्या अरेरावीचा निषेध करीत किशोर पाटील यांच्या विरोधात पत्रकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. सुसंस्कृत महाराष्ट्रात कायदे मंडळाचा एक सदस्यच कायदा हातात घेऊन आपल्या असंस्कृतपणाचे दर्शन घडवतो, आणि वरती "होय मीच शिव्या दिल्या, काय करायचं ते करा अशी" अशी मस्तवाल भाषा वापरतो. हे चिंतादनक, संतापजनक आणि किळसवाणे असल्याने त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी मुख्यमंत्री, गृहमंत्री आदिंना संयुक्त निवेदनाव्दारे करण्यात आली आहे..

महाराष्ट्रात पत्रकार संरक्षण कायदा असला तरी त्याची अंमलबजावणी होत नसल्याने पत्रकारांवरील हल्ल्याच्या घटना वाढल्या आहेत.. राज्यात गेल्या वर्षभरात 46 पत्रकारांवर हल्ले झाले आहेत.. पोलीस पत्रकार संरक्षण कायदानुसार गुन्हे दाखल करायलाही टाळाटाळ करीत असल्याने हा कायदा सर्वार्थाने कुचकामी ठरला असल्याने पत्रकार संरक्षण कायदयाची होळी करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. राज्यातील पत्रकार संघटनांनी, पत्रकारांनी एकत्र येत 17 ऑगस्ट रोजी आपल्या तालुक्याच्या तहसिल आणि आणि जिल्हाच्या ठिकाणी कलेक्टर ऑफिस समोर निदर्शने करून पत्रकार संरक्षण कायदयाची होळी करावी असे आवाहन सर्व पत्रकार संघटनांच्यावतीने करण्यात आले आहे.

बैठकीस अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती, टीव्ही जर्नलिस्ट असोशिएशन, मुंबई मराठी पत्रकार संघ, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघ, बीयूजे, क्राईम रिपोर्टर असोशिएशन, पोलिटिकल फोटो जर्नलिस्ट असोशिएशन, म्हाडा पत्रकार संघ, बृहन्मुंबई महापालिका वार्ताहर संघ आदि संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीनंतर या संघटनांनी राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेऊन राज्यातील पत्रकारांवरील वाढत्या हल्ल्याबद्दल त्यांच्याकडे चिंता व्यक्त केली.

शेकडो खेकडे, कासवांची थायलंडवरून तस्करी

चार आठवड्यात प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे न्यायालयाने निर्देश

प्रतिनिधी
■ मुंबई

जुलै महिन्याच्या अखेरीस शेख शाकीर साबिर अली या इसमाने थायलंडवरून तस्करी करून 200 खेकडे आणि 100 कासव आणले, असा करदम विभागाचा आरोप आहे. त्या संदर्भात झालेल्या सुनावणीमध्ये आरोपीला तपासात सहकार्य करण्याचे तसेच दोन्ही पक्षकारांना चार आठवड्यात प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत.

शेखशाकीरसाबिरअलीनावाच्या व्यक्तीने 27 जुलै 2023 च्या अखेरच्या आठवड्यामध्ये थायलंडमधून शेकडो खेकडे आणि कासव तस्करी करून आणले, असे करदम विभागाला आढळले. याचिकाकर्ता शेख शाकीर साबिर अली याने 7 ऑगस्ट 2023 रोजी समझोत्याकरीता उच्च न्यायालयामध्ये धाव घेतली होती. त्यासंदर्भात शुक्रवारी सुनावणी झाली असता उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते-ढेरे, न्यायमूर्ती गौरी गोडसे यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्याला ताकीद दिली. दोन्ही पक्षकारांना चार आठवड्यामध्ये प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले. तसेच याचिकाकर्त्याला चौकशीमध्ये सहकार्य करावे, असे देखील त्यांनी निर्देशात नमूद केले.

करदम विभागाचे म्हणणे आहे की, दुर्मीळ प्रजातीचे असे प्राणी तस्करी करून आणणे. तसेच त्यांची विक्री करणे, याबाबत अटकपूर्व जामीन अशी तरतूद आहे. परंतु त्याने चौकशीला सहकार्य करण्याऐवजी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्यामुळे त्याने सीमाशुल्क कायदा 1962 तसेच जिवंत प्राण्यांची तस्करी करणे, या कायद्यांचे उल्लंघन केलेले आहे. म्हणूनत्याच्यावर कारवाई होणे जरुरी आहे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

आरोपी आणि याचिकाकर्ता शेख शाकीर साबिर अली याचे म्हणणे आहे की, तो समझोत्यासाठी तयार आहे. करदम विभाग म्हणते की, त्याने कायद्याचे उल्लंघन केलेले आहे. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकल्यानंतर न्यायालयाने चार आठवड्यानंतर प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले. याचिकाकर्त्या आरोपीला तपासात सहकार्य करण्याचे देखील आदेश दिले. करदम विभागाच्या वतीने वकील सत्यनारायण शर्मा आणि शेख यांनी बाजू मांडली. पुढील सुनावणी चार आठवड्यानंतर न्यायालयाने निश्चित केली आहे.

> ***प्राण्यांची तस्करी कायद्याने गुन्हा***
>
> *वन्यजीव गुन्हेगारी प्रतिबंध, शिकारीला आळा घालणे आणि वन्यजीव उत्पादनांच्या व्यापारावर बंदी या उद्देशाने हा कायदा आहे. वन्यप्राण्यांची बेकायदेशीर शिकार केल्याबद्दल किमान 3 वर्षांच्या तुरुंगवासाची तरतूद कायद्यात आहे, जी 7 वर्षांपर्यंत शिक्षा वाढू शकते. तसेच 10,000 रुपये दंड आहे. प्राण्यांची तस्करी करणे हा कायद्याने गुन्हा आहे.*

राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते पहिले माझे कर्तव्य फाऊंडेशनच्या स्मरणिकेचे प्रकाशन

प्रतिनिधी
■ मुंबई

कॅन्सर सारख्या जीवघेण्या आजारासाठी कार्यरत असलेल्या पहिले माझे कर्तव्य फाऊंडेशनच्या संपूर्ण टीमने महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेतली. यावेळी फाऊंडेशनच्या स्मरणिकेचे प्रकाशन राज्यपालांच्या हस्ते करण्यात आले. कॅन्सर रुग्णांसाठी पीएमके करत असलेल्या संपूर्ण कामाची माहिती राज्यपालांना देण्यात आली.

यासोबतच फाउंडेशनच्या आगामी अनेक कार्यक्रमांची माहिती देण्यात आली. पीएमके टीमने आतापर्यंत 200 कॅन्सर रुग्णांना मदत केल्याचे सांगितले जाते. यासोबतच कॅन्ससारख्या आजाराशी लढा देणारे रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांना पुरस्कार देण्याचे कामही ही संस्था करते.या संस्थेतर्फे संपूर्ण मुंबईत कॅन्सर जनजागृतीसाठीकार्यक्रमहीआयोजित केले जातात. याबाबत त्यांच्या कॅन्सर सव्हाविव्हरच्या अध्यक्षा नयना कनाल यांनी सांगितले की मी स्वत: हे दुःख सहन केले आहे, हे दुःख मला कोणीही भोगावे असे वाटत नाही, राज्यपाल साहेबांची भेट घेऊन आम्ही आमचे अनुभव सांगितले व आमच्या कामाची माहिती दिली. संस्थेने केलेल्या कामाचे राज्यपालांनी कौतुक केले. तसेच भविष्यात चांगल्या कामासाठी आशीर्वाद दिले. त्यामुळे आम्हाला आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा मिळेल. यावेळी फाऊंडेशनचे सचिव भूषण राजाध्यक्ष,डॉ.संदीपबिपटे,सल्लागार प्रमुख सीमा यादव, युवा सामाजिक कार्यकर्ते विवेश पष्टे, सुपोषण ग्रुपचे प्रमुख प्रशांत पवार आदी उपस्थित

विकासप्रक्रिया गतिमान करणे हेच 'प्रोजेक्ट मॉनिटरींग कक्षा'चे उद्दीष्ट

उपमुख्यमंत्र्यांच्या 'मॉनिटरींग कक्षा'ची भूमिका मुख्यमंत्र्यांच्या 'वॉर रुम'साठी सहायक व पुरक

प्रतिनिधी
■ मुंबई

कोकण, नाशिक, पुण्यासह राज्यातील महत्वाच्या पायाभूत विकासप्रकल्पांच्या उभारणीतील अडथळे तात्काळ दूर व्हावेत, विकासाची कामे विनाविलंब मार्गी लागावीत यासाठी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार 'प्रोजेक्ट मॉनिटरींग कक्षा'च्या माध्यमातून कार्यरत असून हा कक्ष मुख्यमंत्री महोदयांच्या 'वॉर रुम'ला सहाय्यक, पुरक भूमिका बजावत आहे. 'प्रोजेक्ट मॉनिटरींग कक्षा'चा उद्देश राज्याच्या विकासकामातील अडथळे दूर करून विकासप्रक्रिया गतिमान करणे, महाराष्ट्राला देशातील अग्रेसर राज्य बनवणे हा असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यालयातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण मंत्रिमंडळ राज्याची विकासप्रक्रिया गतिमान करण्यासाठी प्रयत्नशील आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार देखिल 'प्रोजेक्ट मॉनिटरींग कक्षा'च्या माध्यमातून आपले योगदान देत आहेत. उपमुख्यमंत्र्यांनी गेल्या आठवड्यात घेतलेली 'प्रोजेक्ट मॉनिटरींग कक्षा'ची बैठक ही 24 वी बैठक होती. या बैठकीत कोकणातील पर्यटन केंद्रांना जोडणारा कोकण सागरी महामार्ग, रेवस-रेडी सागरी महामार्ग, सातारा-अलिबागची वैद्यकीय महाविद्यालये, पुणे मेट्रो, पुणे रिंग रोड, मुंबईतील जीएसटी भवन, पुणे येथील कृषी भवन, शिक्षण आयुक्तालय, कामगार कल्याण भवन, सहकार भवन, नॉदणी भवन, साखर संग्रहालय, इंद्रायणी मेडिसिटी, पोलिस गृहनिर्माण प्रकल्प, शिरुर-खेड-कर्जत मार्गाचे चौपदरीकरण, 'सारथी'चे प्रशिक्षण केंद्र, वढू-तुळापूरचे स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक, पंढरपूर शहर, विठ्ठल मंदिर परिसराचा विकास आदी विकासकामांच्या प्रगतीचा तसेच निधी उपलब्धतेचा आढावा घेण्यात आला. तसेच विकासकामातील अडथळे दूर करण्याबाबत अधिकाऱ्यांना आवश्यक निदेश देण्यात आले. दर पंधरवड्याला नियमितपणे कक्षाची बैठक घेऊन विकासकामांचा आढावा घेतला जाईल. प्रक्रियेतील अडथळे दूर केले जातील. विकासप्रक्रिया गतिमान केली जाईल, असेही उपमुख्यमंत्री कार्यालयातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. मुख्यमंत्री महोदयांनी 'वॉर रुम'च्या माध्यमातून निश्चित केलेल्या ध्येयपूर्तीसाठी, 'प्रोजेक्ट मॉनिटरींग कक्ष' सहायकाची भूमिका यापुढेही पार पाडत राहील. राज्यातील विकासप्रकल्पांना केंद्राची मंजूरी, मदत, सहकार्य मिळवण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली प्रयत्न केला जाईल. मुख्य सचिवांसह प्रशासनातील सर्व वरिष्ठ अधिकारी, 'वॉर रुम'चे प्रमुख राधेशाम मोपलवार हे सर्वच जण कक्षाच्या बैठकीला उपस्थित राहून 'वॉर रुम' तसेच 'प्रोजेक्ट मॉनिटरींग कक्षा'च्या माध्यमातून योगदान देत आहेत.

या सर्व प्रयत्नांचे सकारात्मक परिणाम निश्चितच दिसतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री कार्यालयातर्फे व्यक्त करण्यात आला आहे. विकासप्रक्रिया गतिमान करण्याच्या या प्रयत्नांकडे वस्तुनिष्ठ आणि सकारात्मकपणे पहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड

सीआयएन : एल २७१०० एमएच १९८५ पीएलसी ०३५२६८
२८/३०, अनंतवाडी, बिनानीभवन, तळमजला, भूलेश्वर, मुंबई४००००२
ई-मेल : spvglobaltrading@gmail.com संकेतस्थळे: www. spvglobal.in

३०जून २०२३ रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी अलेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचा आराखडा

(रु. लाखामध्ये)

अनु. क्र.	तपशिल	एकमेव			एकत्रिकृत		
		संपलेले तिमाही	गेल्या गतवर्षापर्यंत साच झालेल्यावर्षीच्या संपलेले ३ महिने संपलेली तिमाही	संपलेले वर्ष १९.०३.२०२३	संपलेले गतवर्ष १४.०३.२०२२	संपलेले वर्ष १९.०३.२०२३	संपलेले गतवर्ष १४/०३/२०२२
		३०-जून-२०२३	३०-जून-२०२३	३१-मार्च-२०२३	३०-जून-२०२३	३०-जून-२०२३	३१-मार्च-२०२३
१	कार्यचालनातून उत्पन्न कार्यचालनातून महसूल अन्यउत्पन्न	६६४.८४	१६५.८४	२,७६५.१४	१५.८०९.१७	१७,५४३.७७	५९,१४०.५९
२	सामान्य कार्यचालनातून कालखण्डीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (कर अपवादात्मक आणि किंवा अतिरिक्तित बाबी पूर्व)	६.६०	(१९.३२)	६७.३७	६७.९५	१,३५८.८४	१,००३.८४
३	कर पूर्व कालखण्डीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा अतिरिक्तित बाबी पूर्व)	६.६०	(१९.३२)	६७.३७	६७.९५	१,३५८.८४	१,००३.८४
४	कर पश्चात कालखण्डीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा अतिरिक्तित बाबी पूर्व)	४.९५	(१४.५३)	४३.७६	१.११)	९८६.१४	७७१.१२
५	समभाग भांडवल (दर्शनी मूल्य रु. १०/- प्रती समभाग)	१९६.००	२४.५०	१९६.००	२४.५०	१९६.००	२४.५०
६	प्रती समभाग उत्पन्न (अतिरिक्तित बाबी नंतर) (ए) मूळ (बी) सौम्यीकृत	०.२५* ०.२५*	(०.७४)* (०.७४)*	२.२३ २.२३	(०.०६)* (०.०६)*	५०.३१* ५०.३१*	३४.२४ ३४.२४

१. उपरोक्त निष्कर्ष सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिश्क्लोझर रिक्वायरमेंटस) २०१५च्या अनुसार प्रसिद्ध करण्यात येत आहेत आणि लेखापरीक्षण समितीने संमिक्षित केले आहेत आणि संचालक मंडळाने त्यांच्या ऑगस्ट १३, २०२३ रोजी झालेल्या सभेमध्ये संमत केले आहेत. कंपनी (भारतीय लेखामानक) नियमावली२०१५ (इंडोक्वेडी फेमवर करण्यात आल्यानुसार) अनुसार भारतीय लेखामानक (इंडएएस) अनुसार तयार करण्यात आले आहेत आणि कंपनी कायदा२०१३च्या कलम ९३३अंतर्गत अधिसूचित करण्यात आले आहेत.
२. कंपनी एएनपी व्यवसाय विभाग सध्या कार्यरत आहे आणि कंपनीचा सर्व व्यवहार झोन क्षेत्रामोबती आहे. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टड अकाउंटंट ऑफ इंडियाद्वारे जारी करण्यात आलेल्या भारतीय लेखा मानक १०८मध्ये दिलेल्या "ऑपरेटिंगसेग्मेंट"मधे विहित केल्यानुसार अन्य अहवाल योग्य विभाग नाही.
३. गतकालातवीचे आकडे चालू कालावधीच्या आकड्यांशी सुसंगत करण्यासाठी आवश्यकतेनुसार पुर्नगठीत करण्यात आले आहेत.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३० मे, २०२३

एसपीव्ही ग्लोबल लिमिटेडकरीता
सही/-
बाळकृष्ण बिनानी
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन: ००१७५०८८